कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. १९ ऑक्टोबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या आठव्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत ९५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होत्या.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा दि. १२ ऑक्टोबर पासून सुरू झाल्या आहेत. सोमवारी परीक्षेचा आठवा दिवस होता. आज विविध विद्याशाखांच्या १९८ विषयांच्या परीक्षा होत्या. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत झालेल्या परीक्षांच्या विविध सत्रात १२ हजार १० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे दिली तर या सत्रात १५०० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होती. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक श्री. बी.पी. पाटील यांनी दिली.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१९ ( ) पटकथा लेखन, संवाद लेखन, कोरीओग्राफी या सारख्या चित्रपटातील क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी आहेत असे प्रतिपादन हिंदीचे सुप्रसिध्द साहित्यिक उदय प्रकाश यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे हिंदी अभ्यास मंडळ आणि शिवाजी विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य महाविद्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी साहित्य और सिनेमा या विषयावरील ऑनलाईन कार्यशाळेच्या उदघाटनात बीजभाषण करतांना श्री उदय प्रकाश् बोलत होते. या कार्यशाळेचे उदघाटन भारत सरकारच्या तकनिकी शब्दावली आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.अवनीश कुमार यांच्याहस्ते झाले. उदय प्रकाश म्हणाले की, हिंदी साहित्य कृतीवर चित्रपट तयार करण्याची समृध्द अशी परंपरा आहे. या चित्रपटांनी हिंदी लेखकांना आर्थिक पाठबळ दिले. हिंदी साहित्य व सिनेमा या अभ्यासक्रमातून चांगले पटकथा लेखक, संवाद लेखक निर्माण होतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अवनीशकुमार म्हणाले की, विद्यार्थ्यांना या क्षेत्रात रोजगाराच्या मोठया संधी आहेत. आयोगाच्यामाध्यमातून त्यांना मदत केली जाईल असे ते म्हणाले. प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी ईसामुग्रीचे महत्त्व विषद केले. हिंदी विभागप्रमुख डॉ.अशफाक सिखलकर यांनी पाहुण्यांचा परीचय करुन दिला. हिंदी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सुनील कुळकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ.मनोहर पाटील यांनी उदघाटन सत्राचा समारोप केला.

त्यांनतर प्रा.दत्तात्रय मुरुमकर (मुंबई विद्यापीठ), डॉ.गोकुळ क्षीरसागर (शेगांव), डॉ.रामदास तोंडे (वसई), डॉ. पुनीत बिसारीया (बुंदेलखंड), यांनी चित्रपटाच्या विविध अंगांवर प्रकाश टाकला. प्रा.विजय लोहार, डॉ.संगीता कावळे, वैशाली पवार, अमित दुसाने यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.योगेश पाटील, डॉ.पंढरीनाथ पाटील यांनी सुत्रसंचालन केले. डॉ.महेंद्र वाढे, डॉ.आर.के.जाधव, प्रा.मच्छिंद्र ठाकरे, डॉ.संजय रणखांबे यांनी पाहुण्यांचा परीचय करुन दिला. डॉ.सुनील कुळकर्णी यांनी समारोप केला.

---

मा.संपादक,

दैनिक

कृपया वरील बातमी आपल्या दैनिकाच्या जळगाव, धुळे, नंदुरबार आवृत्तीतून प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनिल पाटील
जनसंपर्क अधिकारी